# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०५/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## कोळसा चोरी करणारे आरोपी अटकेत

दिनांक ०६/०५/२०२४ रोजी शितला माता मंदीर गोंडेगाव पुलाचे खाली जुनीवस्ती येथे फिर्यादी नामे— ओमिप्रकाश रामचंद्र पाल, वय ४८ वर्ष, रा. टेकाडी कॉलनी क्वार्टर नं. ११६ ता. पारशिवनी हे सिक्युरीटी इंचार्ज असुन पेट्रोलिंग करत असताना **आरोपी नामे— १) बाबुलाल पटले २) मनिश कवडु परणामे वय ३० वर्ष, ३) राकेश गणेश मारबते वय २२ वर्ष ४) विधीसंघर्ष बालक** हे शितला माता मंदीर गोंडेगाव पुलाचे खाली गोंडेगाव जुनीवस्ती येथुन कोळसा लोड करून आपल्या मोटारसायकलवर १२०० किलो कोळसा चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांना पकडुन कन्हान पोलीसांच्या ताब्यात दिले. त्यांच्या ताब्यातुन १२०० किलो कोळसा किंमती ६०००/—रू. व तिन मोटार सायकली किंमती ४५०००/—रू. असा एकुण ५१०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे ठाणेदार कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक महेश पाटील, सफौ सुर्यभान जळते, पोशि अमिन खान यांनी पार पाडली.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे खापरखेडा:— अंतर्गत मौजा तट्टर नाल्याजवळ सिल्लेवाडा येथे दिनांक ०६/०५/२०२४ रोजी जुन्या वादाचे कारणावरून मृतक नामे मोहम्मद शहीद उर्फ चट्टीला सैय्यद यास आरोपी क्र. १) नामे— हबीब उर्फ छोटू अहमद सलमानी वय २७ याने हातोडी ने डोक्यावर व डाव्या कानावर व आरोपी क्र २) नासिर अहमद सलमान वय २४ वर्ष दोन्ही रा.सिल्लेवाडा याने लाठीने मारून शहीद उर्फ चट्टीला सैय्यद यास जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— तनिज शाबीर अली सय्यद, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ५ सील्लेवाडा खापरखेडा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील आरोपी क्र. २) यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि. धनाजी जळक मो. नं ७०५७९६४७४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर